सकाळ

# सणस विद्यालयात 'फ्लाइंग यंगस्टर्स'

## क्विक हिल फाउंडेशन व पंख संस्थेतर्फे विद्यार्थ्यांमधील संघटन कौशल्याचा शोध घेऊन गट स्थापन



धायरी – सणस विद्यालयात 'शाळांगण फ्लाइंग यंगस्टर्स' गट बनविण्यात आला.

**धायरी :** क्विक हिल फाउंडेशन व पंख संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या नारायणराव सणस विद्यालयातील विद्यार्थ्यांचा ठामपणा, संघटन कौशल्य, नेतृत्वगुण अशा विविध गुणांचा शोध घेऊन त्यांचा गट बनविण्यात आला व या गटाला 'फ्लाइंग यंगस्टर' असे नाव देण्यात आले.

या गटातील मुलांमध्ये उपजत गुणांचा व ऊर्जेचा योग्य ठिकाणी वापर करून त्याद्वारे मुलांना जबाबदार पाल्य, जबाबदार विद्यार्थी व देशाचा जबाबदार नागरिक बनविण्यासाठी प्रोत्साहित करणे, असा गट निवडीमागील उद्देश आहे. या मुलांना 'शाळांगण फ्लाइंग यंगस्टर्स' नावाचे बॅचेस देऊन शाळेतील शिक्षक, मान्यवर व्यक्तींकडून प्रोत्साहित करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन शाळांगण समुपदेशक कौस्तुभ जोगळेकर, श्वेता सूर्यवंशी व मृणाल मापुस्कर यांनी केले.

कार्यक्रमासाठी क्विक हिल कंपनीचे सी.एस.आर. प्रमुख अजय शिर्के, पंख संस्था प्रमुख स्मिता आपटे, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक प्रकाश सबनीस, पर्यवेक्षिका ऊर्मिला पाटील, पर्यवेक्षक संभाजी पाटील, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.